# शेतकरी उत्पादक कंपनीचे व्यवसाय नियोजन



डॉ. सायली साळुंखे प्रा. सुश्मिता काळे
सहाय्यक प्राध्यापिका, कृषी अर्थशास्त्र विभाग
के. के. वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक

शेतकरी उत्पादक कंपन्या निर्मिती व त्यांची परिस्थिती असा विचार केला तर या कंपन्या प्रगतिशील शेतकऱ्यांनी किंवा ग्रामीण भागातील रहिवाशांनी बनविलेल्या आहेत. याचा उद्देश गाव व परीसरातील छोट्या किंवा अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या शेतीविषयक उपक्रमांची एकत्रितरीत्या अंमलबजावणी करणे हा असतो. विविध व्यावसायिक उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी, संचालक मंडळाच्या विविध विषय समित्या बनवून कामाची विभागणी करण्यात यावी. संचालक मंडळातील अकार्यक्षम व कामे सोपवूनसुद्धा संचालक मंडळाच्या जागेवर राहून कोणतेही कामकाज न करणारे संचालक सर्व संमतीने शेतकरी कंपनीने तत्काळ बदलून घ्यावेत, जेणेकरून कंपनीच्या कामकाजास कार्यक्षम संचालकांच्या मदतीने गती देणे शक्य होईल.

## नियामक कामकाज:

शेतकरी उत्पादक कंपनी कायद्यात जरी शेतकरी कंपन्यांची नोंदणी झालेली असेल तरीही, इतर मोठ्या कंपन्यासारखे कामकाज त्यांना करावे लागते. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयामार्फत त्यांना सारखीच वागणूक मिळते. कंपनीचे नियामक अनुपालन विषयक कामकाज, जसे की लेखाविषयक कामकाज, कर आकारणी, संचालक मंडळाच्या विविध जबाबदाऱ्या इ. बाबत शेतकरी वर्ग अनभिज्ञ असतो. यापूर्वी अशा कामकाजाचा कोणताही अनुभव शेतकऱ्यांच्या पाठीशी नसतो, परंतु शासनाच्या विविध योजना मिळविण्यासाठी लेखाविषयक अनुपालनही अत्यंत महत्त्वाची व आवश्यक बाब असल्याने ती पूर्ण करावीच लागते. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने राज्यस्तरावर सुमारे १३४ सनदी लेखापाल व कंपनी सचिव यांचे पॅनेल तयार केले असून ज्या शेतकरी उत्पादक कंपन्यांना कंपनी व लेखाविषयक अडचणी असतील त्यांनी महामंडळास संपर्क साधावा. महामंडळाचे संकेतस्थळ www.mahamcde.com वर कंपनी सचिव व सनदी लेखापाल यांच्या सेवाविषयक माहिती देण्यात आलेली आहे.

## व्यवसायाचे नियोजन:

शेती विषयक सर्व प्रकारच्या कामकाजाची माहिती असते, अशा सर्व संचालकांनी एकत्र बसून शेतकरी कंपनीकरिता व्यवसायाची निवड करण्यासाठी विचार मंथन करणे आवश्यक आहे. याकरिता काही तज्ज्ञ व्यक्तींची मदत घ्यावी. व्यवसाय आराखडा योग्यरीतीने तयार केल्याने व्यवसाय उभारणीची दिशा ठरविण्यास मदत होते. यामुळे शेतकरी कंपनीला विविध व्यावसायिक उपक्रम योग्यरितीने राबविणे व त्यात वाढ करणे शक्य होऊ शकते. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने 'कृषी व्यवसाय वृद्धी कक्ष' निर्माण करून शेतकरी उत्पादक कंपन्यांना विविध व्यवसायविषयक सेवा देण्याचे कामकाज मागील तीन वर्षांपासून सुरू केलेले आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांनी याबाबत महामंडळाचे सहकार्य घेण्यास हरकत नाही. कृषी व्यवसाय वृद्धी कक्षामार्फत व्यवसाय आराखडे बनविणे, विविध व्यवसायविषयक परवाने, प्रशिक्षणाच्या माध्यमातून क्षमता बांधणी व बाजार जोडणी सेवा पुरविण्यात येत आहेत.

शेतकरी उत्पादक कंपन्यांनी प्रगतीच्या दृष्टीने सभासदांकडून व्यवसाय उभारणी आणि व्यवसाय वाढीच्या दृष्टीने भाग भांडवल उभारणी करावी. भांडवल उभारणी फक्त संचालक मंडळ आपआपसात करते, या बाबींमुळे मोठ्या प्रमाणावर भाग भांडवल उभारणी न झाल्याने उद्योग उभारणीस पुरेसे भांडवल शेअर्सच्या रूपाने जमा होत नाही. यामुळे समभाग निधी आणि क्रेडिट गॅरंटी फंड यासारख्या योजना फारच थोड्या कंपन्यांना मिळतात. शेतकरी उत्पादक कंपनी निर्मिती ही पर्यायी बाजारपेठ निर्मितीच्या दृष्टीने झाली असल्याने विक्री व्यवस्था निर्माण करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांनी नवनवीन विक्रीचे मॉडेल निर्माण करणे अपेक्षीत आहे. यामध्ये नाफेड, एनसीडीईएक्स, आठवडी बाजार, थेट विक्री अशा काही मॉडेलवर कामकाज करून विक्रीव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. व्यवसाय उभारणीचा दृष्टिकोन, चिकाटी, व्यवसायातील जोखीम हे गुण सर्वांत महत्त्वाचे आहे. हे गुण सर्व संचालक मंडळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अंगी बाळगण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून भागधारकाला खासगी भागधारकांप्रमाणे संरक्षण दिले जात नाही. भागधारकाचा शेतकरी कंपनीतील कर्तव्य व जबाबदाऱ्या यांबाबत संचालक मंडळ अनभिज्ञ असते. यामुळे भागधारक शेतकरी उत्पादक कंपन्यांकडे आकर्षित होत नाहीत.

## शेतकरी उत्पादक कंपन्या कार्यान्वित होण्यातील महत्त्वाचे मुद्दे:

- व्यवसाय करण्यासाठी वातावरण निर्मिती व सहकार्य.
- आर्थिक सुविधेसाठी पुरवठादारांशी संपर्क व व्यावसायिक नाते संबंध.
- भागधारक, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, कंपनीचे इतर कर्मचारी यांचे अंतर्गत नाते संबंध.

(संपर्क: +९१ )

★ ★ ★